# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर – 01

**Ph. no. 0712-2052101** **e_mail.lemafsu@gmail.com**

जा.क्र.मपमविवि/निशि/335 /2017 दिनांक : 29 /09/2017

## विशेष प्रवेश सुचना परिपत्रक

''पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन'' पदविका अभ्यासक्रमाच्या ज्या पदविका विद्यालयामध्ये अंतिम फेरीनंतर रिक्त जागा राहिल्या असतील त्या जागांवर गरजु विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा या संबंधीत विद्यापीठाकडे निवेदने प्राप्त झालेली आहे. यास्तव विद्यापीठाद्वारे एक विशेषबाब म्हणून प्रवेश इच्छुक अर्जदारास त्याचे शैक्षणिक वर्षाचे नुकसान होऊ नये या उद्देशाने प्रवेशाची संधी उपलब्ध करूण देण्यात येत आहे. प्रवेश फक्त गुणवत्तेच्या आधारावर रिक्त असलेल्याच जागाकरीता राहील. प्रवेशाबाबत संकेतस्थळावरून संपूर्ण माहिती जाणुन घेण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील. त्याकरिता खालील बाबी विचारात घ्याव्या.

1. ज्या उमेदवाराने यापूर्वी प्रवेश अर्ज दाखल केलेले आहे मात्र पात्रता असतांनाही काही कारणास्त प्रवेश अर्ज रद्द झालेले आहे किंवा अर्जदाराने प्रवेश नाकारला आहे किंवा प्रवेश मिळाला नाही अशा उमेदवारांनी लॉगइन आयडी व पासवर्डचा वापर करून अपूर्ण असलेल्या कागदपत्रांची पुर्तता करून अर्ज फेरसादर कारवा.
2. ज्या उमेदवारांनी यापूर्वी ऑनलाईन अर्ज दाखल केला नाही अश्या उमेदवारांनी माहिती पुस्तिका 2017–18 मधील संपूर्ण सुचना वाचुन योग्य त्या शुल्कासह ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा.
3. वरिल 1 व 2 मधील ज्या उमेदवारांना अर्ज ग्राहय झाल्याचा एस.एम.एस. येईल त्याच उमेदवारांनी निश्चित दिनांक व वेळेस आपल्या ईच्छेच्या व जागा रिक्त असलेल्या पदविका विद्यालयामध्ये हजर राहणे आवश्यक आहे.
4. पदविका विद्यालयाच्या प्राचार्यानी निश्चित केलेल्या दिनांक व वेळेवर हजर असलेल्या उमेदवारांची शुल्क व प्रमाणपत्रांची पडताळणी करूनच गुणवत्ता यादी तयार करावी. गुणवत्ता यादीनुसार रीक्त असलेल्या जागेवर प्रवेश दयावा.
5. प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी प्राचार्यानी ऐक्सल फाईल ईमेलद्वारे दोन दिवसांच्या आत घटक महाविद्यालय व विद्यापीठ यांचेकडे सादर करण्यात यावी. त्यानंतरच विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र

त्यांच्या लॉगीन आयडीमध्ये उपलब्ध होईल, त्याची सुचना संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल. त्यानंतर विद्यार्थ्यांनी 15 दिवसाच्या आत प्रवेशपत्राची प्रिंट काढुन घ्यावी.

6. प्रत्यक्ष प्रवेश घ्यायच्या वेळी रिक्त जागा भरल्या गेल्यास अर्जदारास प्रवेश मिळणार नाही. अर्जदार प्रवेशाच्या वेळेस मुळ प्रमाणपत्रे सादर करू शकला नाही किंवा अर्जातील माहिती/प्रमाणपत्रे खोटी असल्याचे निदर्शनात आल्यास कोणत्याही वेळेस प्रवेश रद्द केला जाईल.

## विशेष प्रवेशाच्या तारखा

| अं.क्र. | विवरण | दिनांक |
| --- | --- | --- |
| 1 | प्रवेशाकरीता लॉगीन करूण शुल्क अर्ज सादर करणे किंवा सुधारणा/फेरसादर करणे . | 30/09/2017 ते 04/10/2017 |
| 2 | प्रवेशअर्ज, प्रमाणपत्रे व शुल्क तपासणे. | 05/10/2017 ते 07/10/2017 |
| 3 | उमेदवाराचे प्रवेश पुष्टीकरणाकरिता प्रत्यक्ष पदविका विद्यालयामध्ये हजर राहुन प्रवेश घेणे. | 09/10/2017<br>दुपारी 12.00 वाजता. |

पदविका विद्यालयांना सुचित करण्यात येते की, जास्तीचे वर्ग अयोजीत करून विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पुर्ण करावा.

अधिष्ठाता (नि.शि.)
मपमविवि, नागपूर